आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय  बातमीपत्र– दु १.३० वाजता

८  जून  २०२३ – गुरुवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा अमेरिका दौरा भारत अमेरिका संबंधांना पवित्र करणारा ठरेल असं भारत प्रशांत क्षेत्राचे उच्च पदस्थ कर्ट कँम्पबेल यांचं मत

- रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचं द्वैमासिक धोरण  जाहीर / पॉलिसी रेपोदरात  कुठलाही बदल  न करण्याचा निर्णय

- दहशतवाद आणि फुटीरतावादाला चालना देण्यासाठी वापरण्यात आलेल्या १२४ मालमत्ता जप्त करण्यासाठी एस आय ए आणि जम्मू काश्मीर पोलिसांच्या कायदेशीर मोहिमेला सुरूवात

- राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 44 च्या उधमपूर - रामबाण विभागातला जैसवाल पूल पूर्ण झाला असल्याची,  केंद्रीय रस्ते वाहतूकमंत्री नितीन गडकरी यांची माहिती

**आणि**

- बायपोरजॉय ह्या अतीतीव्र चक्रीवादळाचा प्रवास अरबी समुद्रात वायव्य दिशेनं सुरु

<><><><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा आगामी अमेरिका दौरा भारत आणि अमेरिकेच्या संबंधांना आणखी पवित्र करेल, असं भारत - प्रशांत क्षेत्रासाठीचे जो बायडेन सरकारचे उच्च पदस्थ, कर्ट कँम्पबेल यांनी म्हटलं आहे. भारत आणि अमेरिका यांच्यातला विश्वास आणि दृढ संबंध सध्याचे नसून दशकापुर्वीचे असल्याचंही ते म्हणाले. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या या दौऱ्याबद्दल ते म्हणाले की, जागतिक पटलाच्या पार्श्वभूमीवर हा दौरा अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. या भेटीमुळे गुंतवणूक आणि

लोकांच्या एकमेकांबरोबरच्या संबंध वाढीला चालना मिळेल, असंही कँपबेल म्हणाले. भारत- अमेरिका तंत्रज्ञान क्षेत्रातल्या भागीदारीवर ते म्हणाले की, आमच्या विद्यपाीठांनी अभियंते आणि तत्रज्ञांना आणखी प्रशिक्षण देण्याची गरज आहे. जागतिक पटलावर भारताच्या गंभीर भूमीकेचं सगळ्या जगानं कौतूक केलं असल्यावर त्यांनी भर दिला. अमेरिकेच्या दोन्ही सभागृहाला संबोधीत करणारे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हे भारताचे पहिले प्रधानमंत्री आहेत.

<><><><><><><>

कॅनडामध्ये जंगलातल्या सीमारेषांवर लागलेल्या आगीचा धूर सीमा ओंलाडून अमेरिकेत पोहचला असून लाखो लोक धोकादायक वातावरणात आहे. अमेरिकेच्या एनव्हार्यमेंटल प्रोटेक्शन एजन्सी मेट्रिक, न्यूयॉर्क सिटी आणि पेनसिल्व्हेनियाच्या लेहाई व्हॅलीमध्ये वायु गुणवत्ता निर्देशांक, ४०० च्या वर गेला होता. ५० किंवा त्यापेक्षा कमी पातळी ही चांगली मानली जाते. या वाढलेल्या पातळीचा त्रास निरोगी लोकांना होऊ शकेल, ही शक्यता लक्षात घेऊन बाह्य शारिरिक हालचाली कमी करण्याचा सल्ला दिला नागरिकांना देण्यात आला आहे. प्रमुख विमानतळांवर उड्डाणं थांबवण्यात आली असून, मेजर लिग बेसबॉल खेळ पुढे ढकलण्यात आला आहे.

<><><><><><><>

भारतीय रिझर्व बँकेनं चालू आर्थिक वर्षातील द्वैमासिक पतधोरण आज जाहीर केलं. अपेक्षेप्रमाणे बॅंकेने व्याज दरात कुठलाही बदल केला नाही

धोरण आढाव्याची घोषणा करताना, RBI गव्हर्नर शक्तीकांत दास म्हणाले की, चलनविषयक धोरण समितीने पॉलिसी रेपो दर 6 पूर्णांक 5 दशांश टक्के अपरिवर्तित ठेवण्याचा निर्णय घेतला तर स्थायी ठेव सुविधा अर्थात SDF दर 6

पूर्णांक 25 शतांश टक्के कायम ठेवला. पुर्वीच्या 6 पूर्णांक 75 शतांश टक्यांचा सीमांत स्थायी सुविधा आणि बँक दरात कोणताही बदल करण्यात आला नाही. एमपीसीच्या सहा सदस्यांपैकी पाच सदस्यांनी बहुमताने हा निर्णय घेतला की वाढीला पाठिंबा देताना महागाईवर लक्ष केंद्रित करून ती बरोबरीने ठेवली जाईल. RBI गव्हर्नर म्हणाले की, मार्च-एप्रिल 2023 दरम्यान भारतातील ग्राहक किंमत महागाई कमी होऊन ती ६ पूर्णांक ७ दशांश टक्क्यांपर्यंत खाली आली.

तथापि, ताज्या आकडेवारीनुसार मुख्य चलनवाढ अजूनही ठरविलेल्या उद्दिष्टापेक्षा जास्त आहे आणि 2023-24 च्या आमच्या अंदाजानुसार या चलनवाढीत कुठलाही बदल होणार नाही. ते म्हणाले की आमच्या मूल्यांकनानुसार 2023-24 मध्ये महागाई 4 टक्कयांच्या वर राहील. शक्तीकांत दास म्हणाले की, सर्व घटकांचा विचार करून आणि सामान्य मान्सून गृहीत धरल्यास, CPI चलनवाढ 2023-24 साठी 5 पूर्णांक 1दशांश टक्के राहण्याचा अंदाज आहे.

दास यांनी दोन हजारांच्या नोटा बँकेतून काढण्याबाबत सांगितलं की, मे च्या तिसऱ्या आठवड्यापासून चलनातील घट आणि सरकारी खर्चात वाढ यामुळे प्रणालीतील तरलता वाढली आहे. आरबीआयचे बाजार कामकाज आणि बँकांमध्ये मोठ्या प्रमाणावर दोन हजार रुपयांच्या नोटा जमा झाल्यामुळे या तरलतेत आणखी वाढ झाली आहे.

<><><><><><><>

दूरदर्शन आणि आकाशवाणीच्या पहिल्या इंग्रजी भाषेतल्या वृत्तनिवेदक गीतांजली अय्यर यांच्या निधनाबद्दल माहिती प्रसारण मंत्री अनुराग सिंह ठाकुर यांनी शोक व्यक्त केला आहे. अय्यर यांनी बातम्यांमध्ये विश्वासार्हता सोबतच एका विशिष्ट आवाजानं पत्रकारीता आणि प्रसारण जगतात एक विशिष्ट ओळख बनवली

होती असं मंत्री ठाकूर यांनी आपल्या शोक संदेशात म्हटलं आहे. अय्यर यांचं काल नवी दिल्लीत निधन झालं, त्या ७६ वर्षांच्या होत्या.

<><><><><><><>

पाकिस्तानचे माजी प्रधानमंत्री इम्रान खान यांना पाकिस्तानच्या न्यायालयानं 21 जूनपर्यंत संरक्षणात्मक जामीन मंजूर केला आहे. सरकारी भेटवस्तू विकल्याप्रकरणी खान यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या आधी काल, पाकिस्तान सरकारनं खान, त्यांची पत्नी बुशरा बीबी आणि त्यांच्या जवळच्या साथीदारांविरुद्ध तोशाखाना भेटवस्तूंबद्दल बनावट पावत्या तयार करणं आणि त्या सादर केल्याबद्दल फसवणूक आणि खोटारडेपणाचा गुन्हा नोंदवला होता. लाहोर उच्च न्यायालयानं बुशरा बीबी यांना 13 जूनपर्यंत कोणत्याही परिस्थितीत अटक करण्यापासून पोलिसांना मनाई केली आहे.

<><><><><><><>

जर्मनीचे संरक्षण मंत्री बोरिस पिस्टोरियस आणि त्यांच्या शिष्टमंडळानं आज मुंबईतल्या पश्चिम नौदलाच्या मुख्यालयाला भेट दिली. यावेळी त्यांच्यासोबत जर्मनीचे राज्य सचिव बेनेडिक्ट झिमर ,संचालक जॅस्पर विक, भारतातले जर्मनीचे राजदूत डॉ. फिलिप अकरमन, पश्चिम नौदलाचे फ्लॅग ऑफिसर कमांडिंग-इन-चीफ दिनेश त्रिपाठी आणि इतर शिष्टमंडळ उपस्थित होते. यावेळी पिस्टोरियस यांनी नौदल प्रमुख ॲडमिरल हरी कुमार यांच्याशीही संवाद साधला.

भारत आणि जर्मनीनं 2006 मध्ये द्विपक्षीय संरक्षण सहकार्य करारांवर स्वाक्षरी केली होती. त्यानंतर संरक्षण सहकार्याबाबत परस्परसंवादात लक्षणीय वाढ झाली असून सागरी क्षेत्रातलं सहकार्य हा महत्वाचा भाग आहे.

<><><><><><><>

आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र– दु १.३० वाजता

८ जून २०२३ – गुरुवार

दहशतवाद आणि फुटीरतावादाला चालना देण्यासाठी वापरण्यात आलेल्या जम्मु काश्मीर मधल्या ८६ ठिकाणच्या १२४ मालमत्ता जप्त करण्यासाठी एसआयए आणि जम्मू काश्मीर पोलिसांच्या कायदेशीर मोहिमेला आज सुरूवात झाली आहे.

राज्य तपास संस्था अर्थात SIA आणि जम्मू आणि काश्मीर पोलिसांच्या कार्यकारी गटानं राज्यविरोधी कारवाई संबंधित सरकारच्या शून्य सहिष्णुतेच्या धोरणाशी सुसंगत, दहशतवाद निधीच्या विरोधात कायदेशीर चौकट विस्तृत केली आहे. बेकायदेशीर क्रियाकलाप प्रतिबंध कायदा अर्थात UAPA च्या कलम 8 आणि कलम 25 अंतर्गत SIA ,पोलिस कार्यकारी शाखा आणि संबंधित न्यायालयांनी या कलंकित मालमत्ता जप्त करण्यासाठी कायदेशीर प्रक्रिया सुरू केली आहे. दहशतवादाविरुद्ध दृढ निश्चय दाखवून, आंतरराष्ट्रीय सनद आणि दहशतवादाविरुद्धच्या अधिवेशनांच्या आवश्यकतेनुसार, दहशतवाद समर्थन प्रणालीचं निर्मूलन करण्यासाठी कायद्याच्या योग्य प्रक्रियेंतर्गत ही कारवाई करण्यात आली आहे.

<><><><><><><>

प्रसार भारतीच्या वतीनं आकाशवाणी मुंबई केंद्राच्या प्रादेशिक वृत्त विभागाअंतर्गत मुंबई, रत्नागिरी, परभणी, नांदेड, लातूर, बीड आणि सांगली या जिल्ह्यांसाठी कंत्राटी तत्वावर अर्धवेळ वार्ताहर नियुक्तीसाठी अर्ज मागवले आहेत. २४ ते ४५ वयोगटातले पात्र उमेदवार यासाठी आपले अर्ज सादर करू शकतील. यासाठीची पात्रता, अर्जाचा नमुना तसंच इतर माहिती प्रसार भारती डॉट जीओव्ही डॉट इन स्लॅश पी बी व्हॅकेन्सिंज या दुव्यावर उपलब्ध आहे. इच्छुकांना एअर न्यूज पॅनल ट्वेंटी ट्वेंटी टू ॲट जीमेल डॉट कॉम या ईमेल आयडीवर आपले अर्ज पाठवता येतील.

आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय  बातमीपत्र– दु १.३० वाजता

८  जून  २०२३ – गुरुवार

<><><><><><><>

जम्मू- काश्मिर इथल्या राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 44 च्या उधमपूर - रामबाण विभागातल्या चेनाब नदीवरील 2 मार्गिका असणारा जैसवाल पूल पूर्ण झाला असल्याची माहिती केंद्रीय रस्ते वाहतूकमंत्री नितीन गडकरी यांनी आपल्या ट्वीटच्या माध्यामातून दिली. 118 मीटर लांब असणारा हा पूल वास्तुकलेचा उत्कृष्ट नमुना असल्याचं त्यांनी आपल्या ट्वीट मध्ये म्हटलं आहे.

<><><><><><><>

बायपोरजॉय हे अतीतीव्र चक्रीवादळ गेल्या सहा तासात ताशी सात किलोमीटरच्या वेगानं अरबी समुद्रातून उत्तरेकडे सरकलं. आज दुपारी हे वादळ मुंबईपासून साडे नऊशे किलोमीटर अंतरावर असेल. येत्या 24 तासांपासून तीन दिवसांत हे वादळ वायव्येकडे प्रवास करेल, असं हवामान विभागानं सांगितलं आहे. मासेमारांना 12 तारखेपर्यंत समुद्रात जाण्यास बंदी करण्यात आली आहे. लोकांनाही समुद्र किनारी न जाण्याचा इशारा देण्यात आला आहे.

<><><><><><><>

भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरणने जागतिक अन्न सुरक्षा दिनानिमित्त विज्ञान भवन इथं काल एक संवादात्मक सत्राचं आयोजन केलं होत. या कार्यक्रमाला केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री डॉ. मनसुख मांडविया उपस्थित होते. विविध राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांच्या कामगिरीची दखल घेऊन, डॉ. मनसुख मांडविया यांनी 2022-23 या वर्षाच्या क्रमवारीच्या आधारे विजेत्यांचा सत्कार केला.

//<><><><><><><>//